# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २६/०८/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २६/०८/२००५ रोजी सभा सुचना क्र. १२ दि. २२/०८/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ३) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ४) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ५) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ६) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ७) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |

**<u>गैरहजर सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| २) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ३) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ४) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ५) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ७) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ८) | श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९४ चे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत पाच लाखापेक्षा जास्त जनसंख्या आहे आणि या शहरात अनेक धर्माचे लोक राहतात. गुजराथी, मारवाडी, राजस्थानी, बिहारी, उत्तर प्रदेशी असे संपुर्ण हिंदुस्थानातील लोक या शहरात राहत असून त्या सर्वांचे सण साजरे करण्याकरिता, गणेश विसर्जनाकरिता व इतर सर्व तलाव शहरातील भाईंदर पुर्व-पश्चिम चौपाटी, उत्तन, घोडबंदर घाट येथे मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. तसेच सदर ठिकाणी लाईटस्, लाकडी रेलिंग, उंच स्टेज, मंडप, जनरेटर, टेबल-खुर्ची, स्पिकर, शेडस्, बोटी इत्यादी व्यवस्था करावी लागते आणि त्यासाठी ही व्यवस्था करण्याकरिता मी हा ठराव मांडत आहे.

**डॉ. रमेश जैन :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे. परंतु, इसमे दशमाँ देवी के उत्सव को भी दिया जाए।

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ९४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्वधर्मिय उत्सवातंर्गत श्री गणेशोत्सव, नवरात्र उत्सव, इद, गणगौर, कार्तिक पोर्णिमा, छटपुजा, वेलंकनी उत्सव, जनता दरबार याकरिता विविध व्यवस्था करणे कामांस मान्यता देणे.

**ठराव क्र. १०० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची एकूण लोकसंख्या सुमारे ७.०० लक्ष एवढी असून शहरात सर्वधर्मीय नागरीक एकत्रितपणे राहत आहेत. सदर विविध विविध धर्मीय नागरीकामार्फत विविध सण मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. सदर सणामध्ये प्रामुख्याने श्री गणेशोत्सव, गुजराती समाजाचा नवरात्रोत्सव, राजस्थानी समाजाचा गणगौर, जैन समाजाचा कार्तिक पोर्णिमा, मुस्लिम समाजाचा इद, क्रिश्चन समाजाचा वेलकंनी, दशमा देवी उत्सव याचा समावेश आहे.

श्री गणेश विसर्जना करीता शहरातील सर्व तलाव, भाईंदर पूर्व, भाईंदर (पश्चिम) चौपाटी, उत्तन, घोडबंदर, घाट येथे मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. सदर ठिकाणी लाईटस्, लाकडी रेलिंग, उंच स्टेज, मंडप, जनरेटर, टेबल, खुर्च्या, स्पीकर, सेट बोटी इ. व्यवस्था करावी लागते. इतर समाजाच्या कार्यक्रमाच्या वळी सुद्धा वरील प्रमाणेच व्यवस्था करावी लागते. महानगरपालिका दरवर्षी सदर सर्व कामाकरीता वार्षिक निविदा मागवून काम करुन घेत असते. सन २००४-०५ या वर्षाकरीता मागविलेल्या निविदाची मुदत ही दि. १६.९.०५ रोजी संपत आहे. तत्पूर्वी नव्याने निविदा मागवून ठेकेदारास कार्यादेश देणे गरजेचे आहे. सन २००५-०६ या वर्षाकरीता सर्व धर्मीय उत्सव मंडप लाईट व विविध व्यवस्था करणे कामी लेखावर्षाखाली रु. ४०.०० लक्ष एवढी तरतूद असून रु. ३६,५०,०००/- शिल्लक आहेत. तरी वरील तरतुदीमधून खर्च करावयाचा आहे. वरील कामी येणाऱ्या खर्चास व निविदा मागवून वार्षिक दर मंजूर करुन घेऊन आवश्यकतेनुसार कामे करुन घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर कामी कमी दराच्या निविदाधारकास आर्यादेश देऊन पुढील सभेत निविदेस मान्यता घेण्यांत यावी.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- सौ. ग्रिटा फॅरो.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सभापती साहेब, कोरम दिसत नाही.

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा पंधरा मिनिटांकरिता तहकुब झाल्याचे जाहिर करत आहे.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- सकाळी ११.३५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**